SBSS
# Indian Institute of Medical Sciences Ayurved College
Permitted by NCISM, New Delhi. Affiliated to MUHS, Nashik, MH.
Institution ID-NCISM-AYU0821, MUHS-123131 CET CELL-03138
Email:- iimsnasik@gmail.com Website:- www.iimsmh.com Contact No.:- 0253-2994242

Outward No: SBSS/IIMS/ 527 / 2025 Date: 19 / 09 /2025

## NOTICE NO-138

All **First Year and Second Year B.A.M.S. students** are hereby informed that as per the **circular No-28/2025** received from **Maharashtra University of Health Sciences (MUHS), Nashik** regarding **Krida Mahotsav 2025–26**, the University has announced various sports events, selection trials, and inter-zonal competitions.

Interested students from our college who wish to participate in these events are required to give their names to the **College Sports in charge** on or before **22/09 /2025.**

**Events:** Kabaddi, Kho-Kho, Volleyball, Basketball, Athletics (100m, 200m, 400m, 800m, 1500m, 5000m, 4×100m & 4×400m relay, Long Jump, High Jump, Triple Jump, Shot Put, Discus, Javelin).

Students are advised to actively participate in the events and represent the college. Further details regarding dates, eligibility, and events will be displayed on the notice board.

For more information, kindly observe the University Circular.

**Sports In-Charge Co-ordinator**.

- Dr. Mayur Patil
- Dr. Snehal Gajbhiye

Indian Institute of Medical Sciences Ayurved College
A/p.Manori, Tal.Dindori, Dist.Nashik

19/9/25
Principal
Indian Institute of Medical Sciences Ayurved College
At.Post Manori, Tal.Dindori, Dist.Nashik

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
MUHS
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक - ४२२००४ Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
Tel:(0253) 2539172/6659172/169 ☎ Student Helpline:0253-2539111/6659111/100
Website: www.muhs.ac.in, E-mail: sw@muhs.ac.in

डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ
एम.बी.बी.एस, एम.डी.(न्यायवैद्यकशास्त्र),डी.एन.बी, एल.एल.बी.
कुलसचिव

Dr. Rajendra Shivaji Bangal
M.B.B.S, M.D.( Forensic Medicine), D.N.B, L.L.B.
Registrar

मआविवि/एसडब्ल्यू/स्पोर्टस/१४६६ /२०२५ दि.१७ /०९/२०२५

"परिपत्रक क्र. -२८ /२०२५"

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
विद्यापीठसंलग्नीत सर्व महाविद्यालये
मआविवि, नाशिक.

## क्रीडा महोत्सव २०२५

महोदय/ महोदया,

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे सपुर्ण महाराष्ट्र राज्य असुन विविध आरोग्य विज्ञानाच्या विद्याशाखांची महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहे. विद्यापीठाद्वारे खेळाडु विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व क्रीडा प्रकारांना वाव मिळावा, तसेच चालना मिळावी व त्यांना आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळावी, म्हणुन विद्यापीठ सातत्याने मा. कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल यांच्याद्वारे दरवर्षी आयोजित होणाऱ्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाकरीता, तसेच भारतीय विद्यापीठ संघ यांच्यामार्फत आयोजीत होणाऱ्या अखिल भारतीय पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ (All India West Zone Inter University) क्रीडा स्पर्धा व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेमध्ये विद्यापीठाचा संघ पाठविण्यात येत असतो. सदर संघ पाठविण्यापूर्वी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ संघाची निवड हि राज्यातील प्रत्येक महसूल विभागातील (मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपुर, व अमरावती) विद्यापीठ कार्यक्षेत्रानुसार सहा विभागांमधुन करण्यात येत असते.

त्याअनुषंगाने मा. कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे महामहिम राज्यपाल यांच्याद्वारे दरवर्षी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवाचे आयोजन राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये करण्यात येते. त्याअनुषंगाने नमूद करण्यात येते की, महामहिम राज्यपाल यांचे प्रधान सचिव यांच्या कार्यालयाने नमूद केल्याप्रमाणे या वर्षीचा क्रीडा महोत्सव " स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड " येथे आयोजित होणार आहे. सदर क्रीडा महोत्सवाचे आयोजन तारखा अंदाजीत असल्याने शासनाकडून निश्चित तारखा प्राप्त झाल्यानंतर आयोजनाच्या तारखा परीपत्रकाद्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१. क्रीडा प्रकार (Event) :

सदर क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने सर्वसाधारणपणे खालील क्रीडा प्रकाराची निवड चाचणीचे आयोजन करण्यात येते.

| अ.क्र | मुख्य पाच क्रीडा प्रकाराचे नांव |
|---|---|
| १ | कबड्डी |
| २ | खो-खो |
| ३ | व्हॉलीबॉल |
| ४ | बास्केटबॉल |
| ५ | ॲथलेटिक्स - १०० मी, २०० मी, ४०० मी, ८०० मी, १५०० मी, ५००० मी.<br>- ४×१०० मी. रिले आणि ४×४०० मी रिले, लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी<br>- गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक, |
| | जास्तीत जास्त विद्यार्थी संख्या - ३८ (मुले आणि मुली)<br>संघ व्यवस्थापक - ०१ पुरुष<br>संघ व्यवस्थापक - ०१ स्त्री<br>एकूण - ४० |

(टिप - उक्त तक्त्यामध्ये (अ.क्र.१ ते ५) नमूद क्रीडा प्रकारांसाठी एका महाविद्यालयातून म्हणजेच एका महाविद्यालयाचा जास्तीत जास्त ४० व्यक्तिचा संघ असावा.)

सदर सर्व क्रीडा प्रकारात मुले व मुली सहभागी होवू शकतात. ज्या महाविद्यालयातून कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल व ॲथलेटिक्स या क्रीडा प्रकारासाठी संपुर्ण संघ उपलब्ध नसल्यास, अशा महाविद्यालयांनी कमीत-कमी तीन ते चार खेळाडू निवडचाचणीसाठी पाठविले तरी चालतील.

त्यानुसार विभागीय निवड चाचणी व आंतरविभागीय निवड चाचणी, आयोजन करण्यात आले असुन त्यासंबंधीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे.

-:विभागीय क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रकः-

| अ.क्र. | विभाग | स्पर्धेचे ठिकाण | दिनांक | महाविद्यालय जबाबदार व्यक्ती/ समन्वयक |
|---|---|---|---|---|
| १ | **मुंबई** | बी.के.एल. वालावलकर रुरल वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागीरी | २९ ते ३० सप्टेंबर २०२५ | प्रा. श्रीकांत पराडकर (९८२२६३९३०६) |
| ०२ | **पुणे** | साई आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय, वैराग, सोलापुर | २४ ते २५ सप्टेंबर २०२५ | प्रा. बालाजी दलवे (७७७६८११६८४) |
| ०३ | **नाशिक** | सिंधुताई विखे पाटील नर्सिग महाविद्यालय, नाशिक | २९ ते ३० सप्टेंबर २०२५ | श्री मंगेश पावसे (७०५८५१२०५६) |
| ०४ | **छत्रपती संभाजीनगर** | गुरु मिश्री होमिओपॅथी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर | ०३ ते ०४ ऑक्टोबर २०२५ | श्री गोविद थोटे (७५८८८५०२०९) |
| ०५ | **नागपुर** | व्ही.एस.पी.एम. दंत महाविद्यालय, नागपुर | ०६ ते ०७ ऑक्टोबर २०२५ | प्रा. मनोज मराठे (७३८५५१५४९७) |
| ०६ | **अमरावती** | सरस्वती इन्स्टिटयुट ऑफ नर्सिग सायन्सेस महाविद्यालय, अमरावती | ०६ ते ०७ ऑक्टोबर २०२५ | श्री सुरज निचल (९८९३५१८६२८) |

## -: आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेचे वेळापत्रक:-

| अ. क्र. | स्पर्धेचे ठिकाण | दिनांक | जबाबदार व्यक्ती / समन्वयक |
|---|---|---|---|
| ०१ | मा. श्री. अण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली | ०९ ते १० ऑक्टोबर २०२५ | डॉ सुशांत कणसे (८३०८२२५९६०) |

**२. प्रवेशिका (Nominal Roll of Players)**

विभागीय क्रीडा स्पर्धा निवड चाचणीमध्ये सहभाग घेण्याच्या अनुषंगाने महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन संघात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे. विभागीय निवड चाचणीसाठी संघ पाठविण्यास इच्छुक असलेल्या महाविद्यालयाने, त्यांच्या खेळाडूंची प्रवेशिका, ज्यामध्ये महाविद्यालयाचे नांव, संघव्यवस्थापकाचे नांव, खेळाडु मुलांची व मुलींची नावे इत्यादी माहीती सोबत जोडण्यात आलेल्या प्रवेशिका **परीशिष्ट "अ" (Nominal Roll of Players : Annexure – "A"). मध्ये भरुन दि.२१ सप्टेंबर २०२५ रोजी किंवा त्यापुर्वी संबंधीत विभागीय समन्वयकांना (आयोजक महाविद्यालयाकडे) पत्र / ई-मेलद्वारे पाठवावीत.** तसेच, महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य यांनी संघातील खेळाडू विद्यार्थ्यांची संख्या आणि त्यांची आगमनाची वेळ संबंधीत विभागीय समन्वयकांना कळवावी. जेणेकरुन आयोजकांना प्रशासकीय व्यवस्थेचे नियोजन आणि तयारी करता यईल. जे महाविलद्यालये आपल्या संघांची प्रवेशीका अंतिम तारखेपर्यंत न पाठवता थेट निवड चाचणीसाठी आल्यास, अशा संघांना सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही. तथापी, अपवादात्मक परीस्थितीमध्ये सहभाग घेण्याच्या दृष्टीने विभागीय समन्वयक यांचा अंतिम निर्णय असेल.

**३. विभागीय निवड चाचणी (Zonal Selection Trials)**

वरील सर्व खेळांसाठी विभागीय निवड चाचण्या या आयोजक महाविद्यालयांमध्ये विभागनिहाय घेतल्या जातील. विभागीय चाचणी सुरळीत पार पाडण्यासाठी योग्य व्यवस्था करणे ही आयोजक महाविद्यालयाची जबाबदारी असेल. तसेच, सहभागी होणाऱ्या संघ व्यवस्थापक आणि विद्यार्थ्यांनी देखील आयोजक महाविद्यालयांना सहकार्य करावे. प्रत्येक विभागामधील जिल्हयांचा तपशिल खालील तक्त्यात नमुद करण्यात आलेला आहे.

**विद्यापीठ क्षेत्राचे विभाजन**
**(सहा महसूल विभागनिहाय जिल्हयांचा तपशिल)**

| अ.क्र. | विभाग | जिल्यांचा समावेश |
|---|---|---|
| १ | मुंबई | मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रत्नागीरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्यातील महाविद्यालये |
| २ | पूणे | पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर या जिल्यातील महाविद्यालये |
| ३ | नाशिक | नाशिक ,अहमदनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार या जिल्यातील महाविद्यालये |
| ४ | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, जालना, नांदेड, परभणी, बीड, लातूर, हिंगोली या जिल्यातील महाविद्यालये |
| ५ | नागपूर | नागपूर, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर, भंडारा, वर्धा या जिल्यातील महाविद्यालये |
| ६ | अमरावती | अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम या जिल्यातील महाविद्यालये |

**४. विभागीय निवड चाचण्यांच्या ठिकाणी पोहचणेसंदर्भात (Reporting for Zonal Trials) :**

महाविद्यालयीन संघासोबत किमान एक संघ व्यवस्थापक असणे आवश्यक आहे. तसेच जर संघात मुलींचा सहभाग असल्यास एक महिला व्यवस्थापक असणे देखील आवश्यक आहे. सदर संघांनी संबंधीत मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपुर आणि अमरावती याविभागीय चाचण्यांच्या ठिकाणी खेळाडु विद्यार्थी वेळेत पोहचण्याची जबाबदारी हि स्पर्धेत भाग घेणाऱ्या संबंधित महाविद्यालयांची असेल. तसेच, विभागीय स्पर्धेकरीता आयोजक महाविद्यालयातील स्थानिक समन्वयक व विद्यापीठ नियुक्त संबंधीत महसूल विभागातील विभागीय समन्वयक हे स्पर्धेत सहभागी महाविद्यालयांच्या संघव्यवस्थापकांची **स्पर्धा संपन्न झाल्यानंतर बैठक आयोजित करुन बैठकीचा सविस्तर अहवाल विद्यापीठास तात्काळ ई-मेलद्वारे सादर करतील.**

**५. विभागीय संघाची निवड (Selection of Zonal Team) :**

अ) आंतर विभागीय स्पर्धेमध्ये संबंधित विभागाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी पुरुष आणि महिला यांचा प्रत्येकी १२ खेळाडूंचा समावेश असलेला विभागीय संघाची निवड केली जाईल. तसेच सहा विभागीय समन्वयकांनी **परिशिष्ट "ब"** सोबत जोडलेल्या नमून्यानुसार विभागीय संघातील निवडक खेळाडूंची नावांची सविस्तर यादी (Nominal Roll) तयार करावी आणि **मा. श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली** येथे आंतर विभागीय चाचण्यांसाठी पोहचल्यानंतर **डॉ. सुशांत कणसे (८३०८२२५९६०)** यांच्याकडे सोपवावी.

ब) विभागीय समन्वयक आंतर विभागीय स्पर्धासाठी संघ व्यवस्थापक म्हणून विभागीय संघा सोबत असतील.

क) संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग यांचा सल्ला घेऊन विभागीय क्रीडा समन्वयक बाहेरील ०५ तज्ञ प्रशिक्षक/निवड समिती सदस्य (एक महिला शिक्षिकासह) यांची यादी तयार करतील व सदर यादी **दि. ०६/१०/२०२५** रोजी किंवा त्यापुर्वी विद्यापीठास सादर करतील. त्यानुसार प्रशिक्षक/निवड समिती सदस्य यांची स्पर्धेकरीता निवड करण्यात येईल.

**६. आंतर विभागीय निवड चाचणी (Inter Zonal Selection Trials):**

अ) आंतर विभागीय निवड चाचणी दि.**०९ ते १० ऑक्टोबर २०२५ या कालावधीत** मा. श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली येथे संपन्न होणार असून सदर निवड चाचणीतून प्रत्येक खेळासाठी पुरुष आणि महिला संघाकरीता १८ खेळाडूंचा समावेश असलेले विद्यापीठ संघ निवडण्यात येतील.

ब) विभागीय संघांनी, संघ व्यवस्थापक आणि प्रशिक्षकांसह **दि.०८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता** आंतर विभागीय निवड चाचणीच्या ठिकाणी (मा. श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली) येथे पोहचावे. त्याच बरोबर आयोजक महाविद्यालयातील आंतर विभागीय समन्वयक यांनी **दि.०८ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता** सर्व विभागीय संघ व्यवस्थापक आणि प्रशिक्षक यांची बैठक आयोजित करतील आणि सदर बैठकीचा अहवाल ई-मेलद्वारे विद्यापीठाला पाठवतील.

क) आंतर विभागीय निवड चाचणीसाठी निवड समितीचे सदस्य म्हणून किमान दहा संघ व्यवस्थापक त्यापैकी किमान एक महिला शिक्षिका यांचे विद्यापीठाकडून नामनिर्देशित केली जाईल.

ड) विद्यापीठाने नामनिर्देशित केलेली निवड समिती ही, क्रीडा महोत्सवासाठी संघांची निवड करतील आणि त्यांचा निर्णय अंतिम असेल.

इ) विभागीय समन्वयकाने केलेली प्रवास व्यवस्था सर्व खेळाडू, प्रशिक्षक आणि संघ व्यवस्थापकांसाठी अनिवार्य राहिल व त्यांनी केलेल्या व्यवस्थेला कोणाची हरकत असणार नाही.

फ) सर्व निवड झालेल्या खेळाडूंनी विद्यापीठाचे ओळखपत्रासाठी तीन पासपोर्ट आकाराचे फोटो प्रवेशिकासह (Nominal Roll) सराव शिबीर समन्वयक (Coching Champ Co-ordinator) यांच्याकेडे सुपूर्द करावे.

७. सराव शिबीर आणि क्रीडा महोत्सव (**Coaching Camp & Krida Mahotsav**) :

उक्त नमूद केल्याप्रमाणे " स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड " येथे क्रीडा महोत्सवाचे आयोजन होण्याचे प्रस्तावीत आहे. परंतू, सदर तारखा अंदाजीत असल्याने शासनाकडून निश्चित तारखा प्राप्त झाल्यानंतर सराव शिबीराचे आयाजनाच्या तारखा परीपत्रकाद्वारे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

८. आर्थिक तपशिल (**Financial Aspects**):

क) विभागीय निवड चाचणीत सहभाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा जेवण, उपकरणे, कपडे, स्थानिक प्रवास, तसेच महाविद्यालया पासून ते निवड चाचणीच्या ठिकाणी आणि परत महाविद्यालयापर्यंतचा प्रवास खर्च संबंधीत महाविद्यालय करतील त्याचबरोबर संघ व्यवस्थापक यांचा प्रवास व दैनिक भत्याचा खर्च देखील महाविद्यालयाने करावा याची नोंद घ्यावी.

ख) संबंधित विभागामध्ये विभागीय चाचण्या आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली निवासस्थाने सहभागींसाठी विनामुल्य (मोफत) उपलब्ध करुन द्यावी.

ग) विभागीय स्पर्धा आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांना विद्यापीठाकडून क्रीडा नियमावलीनुसार खर्चाची रक्कम अग्रीम स्वरुपात देय राहिल.

घ) आंतर विभागीय निवड चाचणीचे आयोजक महाविद्यालय मा. श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, जि. सांगली हे आंतर विभागीय चाचणीसाठी सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थी तसेच संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांची राहण्याची व्यवस्था विनामुल्य उपलब्ध करुन देतील.

छ) क्रीडा महोत्सव कालावधीत विद्यापीठाच्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

ज) सर्व क्रीडा स्पर्धेदरम्यान शिस्तीचे पालन करण्यात यावे. याबाबत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळून आल्यास त्याबाबत कडक कार्यवाही करण्यात येईल.

झ) सर्वांना सुचित करण्यात येते की, विद्यापीठाने दिलेल्या सुचनांचे योग्य पालन करावे आणि स्पर्धेदरम्यान सहकार्य करावे.

ट) विद्यापीठ सलग्नीत महाविद्यालयातील सर्व अधिष्ठाता/प्राचार्य यांनी या परीपत्रकास व्यापक प्रसिध्दी देवून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे.

कळावे,

Maharashtra University of Health Sciences MUHS Nashik

17-9-25

कुलसचिव

कुलसचिव
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
नाशिक

प्रत :

१) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि नाशिक
२) मा. प्रति कुलगुरु कार्यालय, मआविवि नाशिक
३) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि नाशिक
४) मा. वित्त व लेखा अधिकारी मआविवि नाशिक
५) सर्व विभागीय कार्यालय, मआविवि नाशिक

Annexure § "A"

MUHS

# Maharashtra University of Health Sciences, Nashik

## NOMINAL ROLL OF THE PLAYERS FOR ZONAL TEAM

१) Name of the College :...........................................................................

२) Name of the Team Manager :........................................................................... e-mail________________________________
Mob. No____________________

३) Name of the Lady Team Manager :........................................................................... e-mail________________________________
Mob. No____________________

| Sr. No | Full Name | Name of College | Mobile No. | E-mail Id | Father's Name | Mother's Name | Date of Birth | Date & Year of passing class XII exam | Date of First year Admission | Present Course | Present Class | Duration of the Course | Date & Year of First Admission in | | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | University | Present Course | |
| १ | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | |

१) Certified that the above individuals are full time students of this college.

२) Above information given is true.

३) Fill up all information in Capital Letters

Date :.....................

Place :....................

Seal of the College

Signature & Name of Dean / Principal